## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर – ४१६ ००४

परिपत्रक क्र.कोविमं/शाखा माध्यमिक परीक्षा/ 2461 / दिनांक : १४.१२.२०१८

**विषय :** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च–२०१९ नियमित, पुनर्परीक्षार्थी, तुरळक विषय, श्रेणी सुधारयोजनेअंतर्गत व खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची अतिविलंब/विशेष अतिविलंब/ अतिविशेषअतिविलंब शुल्काची आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखांबाबत...

**संदर्भ :** क्र.रा.मं./परीक्षा–८/६५७५, दिनांक १२.१२.२०१८.

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र. ४६ अन्वये **मार्च–२०१९** मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची **नियमित, पुनर्परीक्षार्थी, तुरळक विषय, श्रेणी सुधार योजनेअंतर्गत व खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची** नियमित व विलंब शुल्कासह आवेदनपत्रे स्विकारण्याची मुदत संपल्यानंतरही खालीलप्रमाणे विलंबासह आवेदनपत्रे स्विकारण्यात येतात.(शासनाचे क्र.एसएससी–२०११(१८५/११)/उमाशी–२ दिनांक ११ फेब्रु २०१३ च्या पत्रानुसार) १)श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरू होण्यापूर्वी ३० दिवसांचा कालावधी वगळून त्याआगोदर प्रति विद्यार्थी प्रतिदिन रु.५० /- प्रमाणे अतिविलंब शुल्क आकारण्यात येते.२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या आगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रतिदिन रु.१००/- प्रमाणे अतिविलंब शुल्क आकारण्यात येते.३) तद्नंतरच्या १५ दिवसांकरिता व परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत प्रति विद्यार्थी प्रतिदिन रु.२००/-प्रमाणे (शासनाचे क्र.एसएससी–२०११(१८५/११)/उमाशि–२, दिनांक ०२.०२.१२ च्या पत्रानुसार ) अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारण्यात येते. आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रू.५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे ) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रू.१००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अतिविशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रू.२००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे ) |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा(इ.१० वी) मार्च–२०१९ | सोमवार दि.२४.१२.२०१८ ते शुक्रवार दि.११.०१.२०१९ | शनिवार दि.१२.०१.२०१९ ते शनिवार दि.२६.०१.२०१९ | रविवार दि.२७.०१.२०१९ ते रविवार दि.१०.०२.२०१९ |

विलंब शुल्कानंतरची अति विलंब शुल्काची आवेदनपत्रे ही माध्यमिक शाळांनी ऑनलाईन पध्दतीने

**www.mahahsscboard.maharashtra.gov.in**

या किंवा

**www.mahasscboard. in**

**या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्यानंतर विद्यार्थी व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची मूळ प्रत (print out) व अतिविलंब शुल्क मंडळ कार्यालयात रोखीने भरावे किंवा चलन (चलन त्याच दिवशी काढावे) यादी व परिशिष्ट अ इ. त्याच दिवशी (शासकीय सुट्टी वगळता) मंडळाकडे हस्तपोहोच जमा करावयाचे आहे. ऑनलाईन फॉर्म भरला आहे त्याच दिवशी फॉर्म मंडळ कार्यालयाकडे जमा करणे आवश्यक आहे. त्यानंतर फॉर्म आल्यास ज्या दिवशी फॉर्म जमा करणार आहात त्या दिवसापर्यंत अतिविलंब शुल्काची आकारणी केली जाईल याची सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घ्यावी.**

उपरोक्तप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेषअतिविलंब शुल्कान आवेदनपत्रे (**परिशिष्ट अ सहीत**) सादर करावयाच्या तारखा आहेत याची सर्वांनी नोंद घ्यावी व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी. मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्यांचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होऊ शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही असे विद्यार्थ्याकडून हमीपत्र घ्यावे.

मा.विभागीय अध्यक्ष किंवा मा.अध्यक्ष राज्य मंडळ यांचेकडे विद्यार्थ्याकडून परस्पर पाठविलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता शाळेने घ्यावी.

विभागीय सचिव,<br>
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

सोबत :- परिशिष्ट अ

प्रति,

सर्व मान्यता प्राप्त शाळाप्रमुख, सातारा, सांगली व कोल्हापूर.